ePaper
5 जुलै रोजी यायला लागतंय... मराठी जनांना राज आणि उद्धव यांचं आवतन!
वर्ष - 8 । अंक - 322 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™



## आतील पानांत
- पंतकडे 'किंग' बनण्याची संधी!
- बर्मिंघम कसोटीवर पावसाचं सावट?
- सिनेटने 'बिग ब्युटीफुल बिल' मंजूर केलं
- भारतावर लादणार ५०० टक्के टॅरिफ

www.mahaenews.com । बुधवार, दि. 2 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## रवींद्र चव्हाणांच्या रूपाने प्रदेश 'टीम भाजपा' ला नवीन कॅप्टन, आगामी निवडणुका जिंकण्याची मोठी जबाबदारी!

# भाजपाकडून निवडणुकांचे रणशिंग!

## भाजपा नेत्यांची निवडणुकीची तयारी, भाषणामध्ये विरोधकांवर तोंडसुख, ठाकरे बंधू हेच 'टार्गेट'!

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली आणि 'टीम भाजपा' ला नवीन कॅप्टन मिळाला. रवींद्र चव्हाण हे आधीच महाराष्ट्र भाजपाच्या कार्यकारी अध्यक्षपदावर होते. त्यामुळे, या पदासाठी ते योग्य व्यक्ती आहेत, यावर भाजपमध्ये एकमत होते. या निवड सोहळ्यासाठी भाजपाने खास अधिवेशन बोलावले होते, त्यावेळी अनेक ज्येष्ठ नेत्यांची भाषणे झाली आणि सर्वांनी निवडणुकीची तयारी केल्याचे स्पष्ट झाले. यातील प्रमुख वक्त्यांनी ठाकरे बंधू आणि भाषासक्ती या विषयांवर कडाडून हल्ला चढवला, तसेच विरोधकांवर तोंडसुख घेतले.**

### फडणवीस यांचे विश्वासू सहकारी...

रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपा चे बारावे अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत.

### फडणवीस, बावनकुळे कडाडले...

रवींद्र चव्हाण यांचे अभिनंदन करताना आणि त्यांना शुभेच्छा देताना जी भाषणे झाली, त्यामध्ये देवेंद्र फडणवीस आणि बावनकुळे यांनी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावर आणि त्यांच्या दुटप्पी धोरणावर कडाडून टीका केली. यापुढे 'फेक नॅरेटिव्ह' सुरू होईल, अशी सूचना फडणवीस यांनी दिली. लोकसभेच्यावेळी विरोधकांनी हेच केले आणि मते मिळवली, असा आरोपही त्यांनी केला.

### चव्हाण संघाच्या मर्जीतले

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे संघ परिवाराच्या मर्जीतले असून फडणणीस यांचे विश्वासू नेते आहेत. भारतीय जनता पार्टीचा एक साधा कार्यकर्ता म्हणून राजकीय सुरुवात केलेल्या चव्हाण यांनी मोठी भरारी मारली आहे. डोंबिवलीचा साधा नगरसेवक, नंतर स्थायी समितीचे सभापतीपद, चार वेळा आमदार, मंत्री आणि आता सर्वात मोठ्या राजकीय पक्षाचा प्रदेशाध्यक्ष, अशी त्यांची दिमाखदार राजकीय वाटचाल आहे.



### ठाकरे म्हणजे 'फेक नॅरेटिव्ह' ची फॅक्टरी!

उबाठा गट म्हणजे 'फेक नॅरेटिव्ह' ची फॅक्टरी आहे असा टोला फडणवीस यांनी आपल्या भाषणात लगावला. या मंडळींना विकास कामाच्या आधारे दूरदृष्टी देता येत नाही, विकास कामात अडथळे आणायचे आणि निवडणुका जवळ आल्या की 'फेक नॅरेटिव्ह' सुरू करायचा, हा यांचा धंदा झाला आहे. आता, पुढील निवडणुकांमध्ये महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याचा डाव, मराठी संपवण्याचा डाव, मराठी माणूस अडचणीत असल्याच्या काहीतरी अफवा पसरवून मतांसाठी सहानुभूती मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जाईल, असे फडणवीस म्हणाले.



### स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक डोळ्यासमोर..

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली. वरळीमध्ये झालेल्या दिमाखदार सोहळ्यात चव्हाणांचे नाव जाहीर करण्यात आले. यावेळी या नियुक्तीचे निरीक्षक, केंद्रीय मंत्री रिजिजू यांच्यासह प्रमुख भाजप नेते उपस्थित होते.

### सार्वजनिक बांधकाम मंत्रीपद

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना चव्हाण यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तसेच फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिले. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून आता काम पाहतील.

### कोण आहेत रवींद्र चव्हाण ?

यानिमित्ताने रवींद्र चव्हाण यांची राजकीय कारकीर्द पाहणे उचित ठरणार आहे. २००२ साली भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे कल्याण उपजिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी कारकीर्द सुरू केली. २००५ मध्ये काँग्रेस उमेदवाराचा पराभव करत कल्याण-डोंबिवली महापालिकेत नगरसेवक म्हणून एन्ट्री घेतली. त्यानंतर, २००७ मध्ये महानगरपालिका स्थायी समितीचे सभापती म्हणून यशस्वी जबाबदारी पार पाडली आणि २००९ पासून डोंबिवली विधानसभा मतदारसंघाच्या निर्मितीपासून सलग चार वेळा आमदार म्हणून त्यांनी विजय मिळवला आहे.

### निवडणुकांमध्ये यश मिळवणार


आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, तसेच महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणणे आणि भाजपा ला एक नंबरचा पक्ष बनवणे, हे माझ्या समोरील आव्हान असेल, असे रवींद्र चव्हाण म्हणाले. भाजपाचा मी एक साधा कार्यकर्ता आहे, आणि कार्यकर्त्याला मोठे करणारा हा पक्ष आहे. इतर पक्षांमध्ये हे शक्य नसते, असेही त्यांनी सांगितले.

# अवजड वाहतूकदार संपावर!

## शालेय विद्यार्थी वाहतूकदारांची तूर्तास माघार, मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जड-अवजड वाहतूक करणाऱ्या संघटनांच्या मागण्यांबाबत सरकारच्या पातळीवर मंगळवारी मंत्रालयीन पातळीवर तोडगा निघाला नसल्याने मालवाहतूक करणारे (ट्रक, टॅम्पो, टँकर आणि ट्रेलर) वाहनचालक मध्यरात्री बारा वाजल्यापासून बेमुदत संपावर गेले आहेत. प्रवासी वाहतूक संघटना आणि शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या संघटनांनी संपातून तूर्तास माघार घेत, दोन दिवसांनंतर संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.**



'विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मालवाहतूक करणाऱ्या राज्यभरातील संघटनांनी संप सुरू केल्याने अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांसह जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक खंडित होणार आहे. त्यामुळे जनसामान्यांवर संपाचा परिणाम होणार आहे,' असे महाराष्ट्र राज्य, माल आणि प्रवासी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष बाबा शिंदे यांनी सांगितले.शिंदे म्हणाले, 'वाहतूक संघटनेच्या मागण्यांकडे राज्य सरकार दुर्लक्ष करत आहे. १६ जून रोजी राज्य सरकारला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. २९ जूनपर्यंत आझाद मैदानात उपोषण करण्यात आले. मात्र, सरकारकडून दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.' 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी प्रवासी आणि शालेय विद्यार्थी वाहतूक संघटनांची बैठक घेण्याचे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. त्यामुळे तूर्तास या संघटना संपात सहभागी झालेल्या नाहीत,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले.वाहतूकदारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत आज (२ जुलै) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक होणार आहे. या बैठकीत अपेक्षित तोडगा न निघाल्यास दोन दिवसांत राज्यातील शालेय बस-व्हॅनचालक संपात सहभागी होतील. सुरू झालेल्या संपाला संघटनेचा पाठिंबा आहे.'विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मालवाहतूक करणाऱ्या राज्यभरातील संघटनांनी संप सुरू केल्याने अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांसह जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक खंडित होणार आहे. त्यामुळे जनसामान्यांवर संपाचा परिणाम होणार आहे,' असे महाराष्ट्र राज्य, माल आणि प्रवासी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष बाबा शिंदे यांनी सांगितले.शिंदे म्हणाले, 'वाहतूक संघटनेच्या मागण्यांकडे राज्य सरकार दुर्लक्ष करत आहे. १६ जून रोजी राज्य सरकारला मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

### फडणवीस यांच्यासोबत बैठक

२९ जूनपर्यंत आझाद मैदानात उपोषण करण्यात आले. मात्र, सरकारकडून दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.' 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी प्रवासी आणि शालेय विद्यार्थी वाहतूक संघटनांची बैठक घेण्याचे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. त्यामुळे तूर्तास या संघटना संपात सहभागी झालेल्या नाहीत,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले.वाहतूकदारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत आज (२ जुलै) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक होणार आहे. या बैठकीत अपेक्षित तोडगा न निघाल्यास दोन दिवसांत राज्यातील शालेय बस-व्हॅनचालक संपात सहभागी होतील. सुरू झालेल्या संपाला संघटनेचा पाठिंबा आहे.

# प्रभागाच्या प्रारूप आराखड्याचे आदेश

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांबाबत प्रशासनाची तहसीलदारांना सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रभागरचनेचा प्रारूप आराखडा करावा, अशी सूचना जिल्हा प्रशासनाकडून तहसीलदारांना करण्यात आली असून, त्याबाबतचे आदेश जिल्हा प्रशासनाकडून काढण्यात आले आहेत. प्रभागाचा प्रारूप आराखडा १४ जुलैपर्यंत जिल्हा प्रशासनाला सादर केला जाणार आहे.**




राज्य सरकारला सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशानुसार, राज्याचा नगरविकास विभाग तसेच ग्रामविकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रभागरचनांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गट, गण रचना करण्याचे आदेश यापूर्वीच ग्रामविकास विभागाने काढले आहेत. त्यानुसार, जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनी संबंधित भागातील लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि आरक्षणाचे निकष लक्षात घेऊन प्रारूप आराखड्याचे काम सुरू केले आहे. प्रारूप प्रभाग आराखडा सादर करण्याची मुदत १४ जुलैपर्यंत आहे, अशी माहिती समन्वय अधिकारी चारुशीला देशमुख यांनी दिली. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडे सर्व तालुक्यांकडून प्रारूप आराखडा प्राप्त होताच त्याची तपासणी तसेच दुरुस्ती केली जाईल. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समितीच्या नोटीस बोर्डसह संकेतस्थळावर प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे हरकती आणि सूचना सादर करण्यात येणार आहेत. त्या हरकतींनुसार जिल्हाधिकारी अभिप्रायासह विभागीय आयुक्तांना प्रस्ताव सादर करण्यात येणार असून, त्यावर पुन्हा हरकती घेऊन सुनावणी घेतली जाईल.'येत्या २५ ते २९ जुलैपर्यंत नगर परिषदांकडून, तसेच नगर पंचायतीकडून ३० जुलै ते सहा ऑगस्टपर्यंत प्रारूप आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत,' असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.यालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशानुसार, राज्याचा नगरविकास विभाग तसेच ग्रामविकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रभागरचनांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गट, गण रचना करण्याचे आदेश यापूर्वीच ग्रामविकास विभागाने काढले आहेत. त्यानुसार, जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनी संबंधित भागातील लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि आरक्षणाचे निकष लक्षात घेऊन प्रारूप आराखड्याचे काम सुरू केले आहे.

### सादर करण्याची मुदत 14 जुलैपर्यंत

प्रारूप प्रभाग आराखडा सादर करण्याची मुदत १४ जुलैपर्यंत आहे, अशी माहिती समन्वय अधिकारी चारुशीला देशमुख यांनी दिली. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडे सर्व तालुक्यांकडून प्रारूप आराखडा प्राप्त होताच त्याची तपासणी तसेच दुरुस्ती केली जाईल. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समितीच्या नोटीस बोर्डसह संकेतस्थळावर प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## खाजगी कंपनीला स्वच्छतेसाठी कोट्यावधींचे कंत्राट

# लोणावळ्यात कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे दर्शन!

### कचऱ्याच्या ढिगारांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक

। लोणावळा

।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मागील पाच वर्षात राष्ट्रीय स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेत सलग पाचव्यांदा राष्ट्रीय पातळीवर दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या लोणावळा नगरपरिषदेने लोणावळा नगरपरिषद कार्यक्षेत्रातील साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी बीव्हीजी या नामांकित कंपनीला सुमारे साडेनऊ कोटी रुपयांचा वार्षिक ठेका दिला आहे. असे असतानाही लोणावळ्यात ठिक ठिकाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे दर्शन होत आहे.**



आश्चर्याची बाब म्हणजे लोणावळा नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळच मागील तीन चार दिवसांपासून कचऱ्याचा ढिगारा असतानाही परिषदेच्या अधिकारी, कर्मचारी तसेच आरोग्य विभागाला एवढा मोठा कचऱ्याचा ढिगारा दिसत नसल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे.

लोणावळा नगरपरिषदेला स्वच्छ सर्वेक्षण अभियान स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर विविध पुरस्कार मिळाले आहेत. या कालावधीत लोणावळा नगरपरिषदेतील लोकप्रतिनिधींचा पंचवार्षिक कार्यकाल चार वर्षांपूर्वी संपल्यानंतर नगरपरिषदेवर प्रशासकीय राजवट लागू झाली. लोणावळा नगरपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षण अभियान स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर मिळविलेल्या दैदिप्यमान यश व कामगिरीत सातत्य कायम रहावे यासाठी नगरपरिषदेने ज्या आपल्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीच्या जोरावर पाचव्यांदा राष्ट्रीय पातळीवर यश मिळविले, त्यांच्या मेहनतीवर विश्वास न ठेवता लोणावळा शहराच्या स्वच्छतेसाठी एका खाजगी ठेकेदार कंपनीला सुमारे साडेनऊ कोटी रुपयांचा ठेका देण्यात आला.

सुरुवातीला या ठेक्यावरुन राजकीय विरोध दर्शविण्यात आला. लोणावळ्याच्या स्वच्छतेसाठी बीव्हीजी कंपनीला साडेनऊ कोटी रुपयांचा वार्षिक ठेका देण्यात आला असून, जवळपास २४० कामगार करत आहेत. बीव्हीजी कंपनीचे जवळपास २४० कामगार आणि लोणावळा नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाचे कामगार मिळून लोणावळ्यात स्वच्छतेचे काम करत आहे. असे असतानाही सध्या काही दिवसांपासून लोणावळ्यात ठिक ठिकाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्यांचे दर्शन होत आहे. लोणावळ्यात दर शुक्रवारी आडवडे बाजार भरत असतो.नुकताच बाजार होऊन तीन दिवस उलटले तरी अद्याप बाजार भरणाऱ्या रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे होते. सर्वात मोठी शरमेची बाब म्हणजे लोणावळा नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारा जवळच ३ ते ४ दिवसांपासून कचऱ्याचा ढिगारा आहे. या ठिकाणाहून येता जाता नगरपरिषदेच्या कर्मचारी, अधिकारी व आरोग्य विभागाला आपल्याच नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळचा कचऱ्याचा ढिग दिसत नाही का असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

#### भांगरवाडी बनला मिनी कचरा डेपो!

भांगरवाडीतील शेडगेचाळ व तेथील रस्ता हा जणू मिनी कचरा डेपो झाल्याचे चित्र आहे. २ ते ३ महिने झाले येथील कचरा व ढिगारे अद्याप तसेच आहे. या ठिकाणाहून येताना जाताना शेकडो विद्यार्थी व नागरिकांना येथील कचऱ्याच्या दुर्गंधीला व घाणीला रोज सामोरे जावे लागत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्यावरही कचरा पसरला आहे.

#### अधिकाऱ्यांचे हात वर

लोणावळा नगर परिषदेमध्ये वातानुकुलीत कक्षात बसणारे अधिकारी व आरोग्य विभाग नक्की काय करतात हा प्रश्न पडतो. संबंधित कंपनीला करोडो रुपयांचा ठेका देण्यात येऊनही तसेच परिषदेचे आरोग्य विभागाचे कर्मचारी असतानाही शहरातील कचऱ्याची हि परिस्थिती असेल तर हि केवळ नागरिकांच्या पैशाची लुटमार आहे. नगरपरिषदेने खाजगी कंपनीला ठेका देऊन जबाबदारी पासून हात वर केले असल्याची टीका देखील आता होत आहे.

## हिंजवडीची कोंडी सोडवण्यासाठी पुढाकार!

### ‘पीएमआरडीए’ने उचलली पावलं : नैसर्गिक प्रवाहांची केली पाहणी

। पिंपरी-चिंचवड ।


महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**हिंजवडी, माण आणि मारुंजी भागातील नागरी समस्यांसह वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्यासह प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मंगळवारी (दि.१) पाहणी केली. यात नैसर्गिक ओढे - नाल्यांतील पाण्याचा प्रवाह रोखणाऱ्यांना दिलेल्या निर्देशानुसार त्यांनी अपेक्षित दुरुस्ती केली, की नाही याची पाहणी यादरम्यान करण्यात आली.**



हिंजवडी फेज - १, २ आणि ३ तसेच मेट्रो मार्गासह परिसरात १३ ठिकाणी ओढे - नाल्यांचा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह परस्पर बदल / अडवल्याचे पुढे आले होते. त्यामुळे संबंधितांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि एमआयडीसीतर्फे नोटीस देत पाण्याचा प्रवाह ३० जूनपर्यंत नैसर्गिकरित्या मोकळा करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने मंगळवारी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्यासह इतर यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरित्या हिंजवडी, माण, मारुंजी भागात पाहणी करत नोटीस बजावण्यात आलेल्या संबंधितांनी त्यांना दिलेल्या निर्देशानुसार काम केले, की नाही याची पाहणी केली. यासंबंधी अहवाल आल्यानंतर संबंधितांनी पाण्याचा प्रवाह खुला केला नसेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी दिले. मारुंजी - विप्रो सर्कल रोडवरील शेवटच्या ३०० मीटर रस्त्याचे काम उद्यापासून हाती घेण्यात येणार असून १५ ते २० दिवसात ते पूर्ण करण्यात येणार आहे. यासंबंधी अडचणी समजून घेत तातडीने काम सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले. संबंधित रस्ता पुढे लक्ष्मी चौकात निघत असल्याने हिंजवडीतील वाहतूक कोंडीला मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल. यासह विविध भागाची पाहणी करून मेट्रो प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, मुख्य कार्यकारी अभियंता रिनाज पठाण, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक सुनिल मरळे यांच्यासह इतर प्रशासकीय यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### गुरु कशाला हवा ?

व्यवहारात सुद्धा आपल्याला गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? प्रपंचात सुखदु:ख झाले, समाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच गुरू करील. प्रपंच आम्हाला कडू वाटला तरच शिष्य होण्याचा प्रश्न. शिकावे असे ज्याच्या मनात येते तो शिष्य, आणि जो शिकवितो तो गुरू. मला काही कळत नाही असे ज्याला वाटते तोच गुरू करील. मी ' राम, राम ' म्हणतो, वाईट मार्गाने जात नाही, मग गुरु कशाला हवा, असे काहीजण म्हणतात. ' मी ' केले ही जाणीव आड येते, म्हणून सद्‌गुरूची आवश्यकता आहे. सत्कर्माचा अभिमान जर आपल्याकडे घेतला तर रामाचा विसर नाही का पडला ? अभिमान गेल्याशिवाय राम नाही भेटणार. देवाजवळ गेला तरी नामदेवाचा अभिमान नाही गेला, म्हणून भगवंतांनी त्याला ' गुरू कर ' म्हणून सांगितले. संताच्या कृपेने दुखणे बरे झाले म्हणून त्याला मानणे हे खरे नव्हे. जो शिष्याला विषयात ओढील त्याला गुरू कसे म्हणावे ? जो काही चमत्कार करून दाखवील त्याला आम्ही बुवा म्हणतो. संताची परीक्षा आम्ही बाह्यांगावरून करतो. सर्वांभूती भगवंत ज्याला पहाता येईल त्याला संताची खरी ओळख होईल. संताच्या संगतीत आपल्या मनावर जो परिणाम होतो, त्यावरून आपण संताची परीक्षा करावी. माझे चित्त जिथे निर्विषय होईल तिथेच संताची खरी जागा म्हणता येईल. ज्याला भगवत्प्राप्तीची तळमळ लागली आहे, त्यालाच शिष्य म्हणावे. जो गुरुआज्ञेबाहेर जात नाही, आणि गुरू हेच भगवंतप्राप्तीचे साधन मानतो, तो सच्छिष्य होय. गुरूपरता देवधर्मच नाही मानू. काही कानडी माणसे महाराष्ट्रात आली. त्यांना मराठी येत नव्हते. त्यांनी एक दुभाषी गाठला आणि त्याच्या मागोमाग ती पुष्कळ ठिकाणी हिंडली. त्यांची चिंता आणि जबाबदारी त्या दुभाष्यावर पडली. तशी आपण दुभाष्याची म्हणजे सद्‌गुरूची संगत केली पाहिजे. तो म्हणेल तिथे जावे, तो सांगेल तसे करावे, मग परमात्मा मिळेलच. शास्त्रे आणि वेद अनंत आहेत; ते शिकायला आपल्याला वेळ कुठे आहे ? सद्‌गुरूंनी नवनीताप्रमाणे सर्व साधनांचे सार असे जे नामसाधन सांगितले, ते आपण करावे, म्हणजे भगवंताचे प्रेम लागेलच. बाजारात गेल्यावर, जो माल आपल्याला अनुकूल आणि माफक दराचा असेल तोच घ्यावा, त्याप्रमाणे परमार्थाच्या अनेक साधनांत आपल्याला अनुकूल आणि माफक असे नामस्मरण हेच एक उत्तम साधन आहे; तेच करावे आणि आनंदाने रहावे. व्यवहारात सुद्धा आपल्याला गुरू करावा लागतो, तर त्याच्यापेक्षा अवघड ज्ञान होण्यासाठी गुरू नको असे म्हणून कसे चालेल ? प्रपंचात सुखदु:ख झाले, समाधान मिळाले नाही, तर मग खरे सुख कुठे आहे आणि ते मला कोण दाखवील, अशी ज्याला तळमळ लागेल तोच

# शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पामध्ये, प्रवास कमी, स्पीड ब्रेकर जास्त!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**शक्तिपीठ महामार्ग हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अतिशय महत्वाकांशी प्रकल्प असून वाटेल ते झाले तरी प्रकल्प साकारायचा असा चंग त्यांनी बांधला आहे. पण, प्रत्येक जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध पाहता, हे स्वप्नच राहणार की काय, असे वाटू लागले आहे. या महामार्गामध्ये प्रवास कमी आणि 'स्पीड ब्रेकर' च जास्त असे म्हणण्याची दुर्दैवाने वेळ आली आहे!**



### ६८ हजार कोटीची तरतूद..

शक्तिपीठ महामार्गासाठी 'महायुती' सरकारने थोडीथोडकी नव्हे, तर ६८ हजार कोटीची तरतूद केली असून सुमारे चार हजार हेक्टर सुपीक जमीन अधिग्रहित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा महामार्ग पर्यटनावर, शेतकरी, जलसंपत्ती यांच्या शाश्वत विकास करू शकतो, असा दावा सरकारतर्फे करण्यात आला आहे. शेतीमालाला चांगला उठाव मिळेल आणि योग्य दळणवळणामुळे मार्केटही मिळेल, हे मान्य!

### शेतकरी पूर्णपणे संभ्रमात..

तथापि, विकसनाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत करण्याचा हा डाव असल्याचा आरोप होत आहे. सरकारचा हा उद्देशच शंका निर्माण करणारा असून धोरणात्मक आहे. सरकारच्या या योजनेला विरोध आहे. राज्यभर शेतकऱ्यांच्या आक्रमकतेसह या योजनेविषयी अनेक प्रश्न उठवले जात आहेत. काही ठिकाणी तर कोट्यवधी रुपयांच्या संपादन आराखड्यांत बदल सुचवले गेले आहेत. जमिनीची मोजणी करणारे अधिकारी आणि संपादनाच्या प्रक्रियेला शेतकरी बांधवांचा तीव्र विरोध असून आंदोलने आणि मोर्चे सुरू आहेत.

### शेतकरी, व्यापारी हवालदिल !

तर या शक्तिपीठाच्या सुपीक आणि औद्योगिक क्षमतेच्या जमिनींवरून जाणाऱ्या महामार्गाने स्थानिक शेतकरी, व्यावसायिक तसेच उद्योगपती हवालदिल झाले आहेत. या प्रकल्पाच्या विरोधकांनी कृतीद्वारे आणि लेखनाद्वारे महामार्गाला दूर केले आहे. पण, शेतकऱ्यांच्या या मागण्या आणि दृष्टिकोन स्वीकारायला सरकार तयार नाही असे चित्र रंगत आहे.

### जमिनीच्या मोबदल्याचा मोठा प्रश्न

शेतकऱ्यांच्या जमिनीला माफक दर तर मिळतच नाही. पण, दैनंदिन खर्चासाठीदेखील काही फायदाही होत नाही. लहानशा झोपडीसाठी सरकार दोन हजार रुपये भाडे देते, असा अनुभव अनेकांना आहे. पण, सरकार त्यांच्या मागण्या कधी पूर्ण करत नाही. जमिनीचे मोल नसते असे दाखवून ६८० किलोमीटरहून जास्त असणाऱ्या या महामार्गाला 'शक्तिपीठ महामार्ग' असे नाव देण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे!

### नियोजनाचा अभाव, प्रकल्प अधांतरी

मुळात या महामार्गाचे नियोजन स्पष्ट नाही. प्रकल्प आणि व्यवहारांची तपासणी झाली नाही. ज्या भूभागातून हा मार्ग जाणार आहे, तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी व घरे हिसकावली जात आहेत, अशी शेतकरीची भावना झाली असून त्यांना स्पष्ट उत्तरे दिली जात नाहीत, हे दुर्दैव आहे !

### सरकार आणि शेतकऱ्यांमध्ये संघर्ष..

अशी दूरदृष्टी नसल्यामुळे सध्याचे सरकार-शेतकऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. सरकारकडून अतिशय गोंधळात ढिसाळ नियोजन केले गेले आहे. यातून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला असून ते आंदोलक झाले आहेत. यामुळे सरकारवर अधिकचा ताण आहे. सरकारी अधिकाऱ्यांना किंवा मोजणी अधिकाऱ्यांना हे शेतकरी दमदाटी करून हाकलून देत आहेत असे विदारक चित्र राज्यात सर्वत्र आहे.

### नागपूर-गोवा प्रवासाचे सुखद स्वप्न

हा महामार्ग नागपूरपासून गोव्याच्या सीमांपर्यंत जाणार असून, यात कोल्हापूरची श्री महालक्ष्मी, तुळजापूरची श्री तुळजाभवानी आणि पंढरपूर ही शक्तिपीठे, औंढा नागनाथ, बेळगाव ही ज्योतिर्लिंगे, पंढरपूर, अक्कलकोटशी संबंधित तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. हा प्रकल्प धार्मिक महत्त्व जोडून आहे, जो इतर प्रकल्पांप्रमाणे बांधू शकला असता. सरकारच्या योजनेतून हेच दर्शवित आहे की, हा व्यावसायिक आराखडा आहे, हे शेतकऱ्यांच्या लक्षात आले आहे.

### खेडोपाडी विदारक स्थिती..

दैनंदिन खर्चासाठी दोन हजार रुपये मिळाले तरी शाळांना शिक्षक नाहीत, रुग्णालयांना डॉक्टर नाहीत. सरकारी कार्यालयात कर्मचारी नाहीत, पण सरकारनेही त्यांना अधिक निधी दिला नाही, तो भरीव लाभ मिळालेला नाही. त्यातून अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. दुसरीकडे नियोजनाचा सरकारचा हेतू संदिग्ध असल्याचा मानला जात आहे आणि हाच धागा धरून स्थानिक नेते शेतकऱ्यांना भडकावत आहेत. यातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी आणि व्यापारी यांचा विरोध आहे. यामध्ये जालना, बीड, उस्मानाबाद आणि मराठवाड्याच्या जिल्ह्यांमध्ये तीव्र विरोध होत आहे, तेथील शेतकरी प्रचंड आक्रमक आहेत.

### शेतकऱ्यांमध्ये दिशाभूलीची भावना..

या प्रकल्पाच्या खोलात शिरले तर शेतकऱ्यांचे हित नसेल तर तो विकास नाही. या सगळ्या प्रकरणातून शेतकऱ्यांची दिशाभूल होत आहे. हिंगोली, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, रत्नागिरी, लातूर, बीड, धुळे, धाराशिव, वाशिम, नागपूर या जिल्ह्यांतून हा महामार्ग जाणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत, अनेकांच्या जात आहेत आणि शेतकऱ्यांची दिशाभूल होत असल्याची भावना खोलवर रुजत आहे, हे सरकारने लक्षात घ्यायला हवे ! त्यांचे जीवन उद्‌ध्वस्त केले जात असून त्यांना योग्य भरपाई मिळालेली नाही.

### विश्वासात घ्या, अन्यथा..

सरकार बाबतची एक गोष्ट रुजत चालली आहे की शक्तिपीठ महामार्ग निर्माण करण्याचे उद्दिष्ट रास्त वाटत नसून, हे शेतकऱ्यांच्या हितासाठी नव्हे तर व्यावसायिक प्रकल्प असल्याचा आरोप आहे. हा महामार्ग शेतकऱ्यांच्या जीवनावर परिणाम करणार आहे. सरकारचे धोरण चुकीचे आहे. शेतकऱ्यांचा या प्रकल्पावर विश्वास नाही. वास्तविक, या भूमिकेतून सरकार विचार करणार असेल, तर योजना शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बदलली पाहिजे. एकूण विचार करता या शक्तिपीठ महामार्गाचा प्रवास सुकर नसून मोठ्या प्रमाणावर स्पीड ब्रेकर उभारण्यात आले आहेत, हे निश्चित!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महामार्गाची जमीन मोजणी प्रक्रिया बंद!

## पूर्णा तालुक्यातील सुरवाडी येथेही शेतकऱ्यांनी मोजणी बंद पाडली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**‘एकच जिद्द शक्तिपीठ रद्द ’अशी घोषणा करत जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पडत्या पावसात आज, मंगळवारी आंदोलन केले. जिल्ह्यात दोन ठिकाणी शेतकऱ्यांनी रास्ता रोको केला. तर दोन ठिकाणी शक्तिपीठ महामार्गाची मोजणी प्रक्रिया संतप्त शेतकऱ्यांनी रोखली. मोजणी बंद पाडल्याने आलेले अधिकाऱ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले.**



कानेगाव (ता. सोनपेठ) येथील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गासाठी संपादित होणाऱ्या जमीन मोजणीला तीव्र विरोध दर्शवला. आपण कोणत्याही परिस्थितीत ही मोजणी करू नये. या मोजणीला आमचा विरोध आहे, अशी भूमिका यावेळी रामचंद्र पंडितराव मोकाशे, धनंजय चंद्रकांत मोकाशे, हेमंत चंद्रकांत मोकाशे, शंकर राठोड, महादेव डुकरे, किसनराव इखे यांनी घेतली.यावेळी शेतकऱ्यांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. या भागातील शेतकऱ्यांचे सर्व भवितव्य हे शेत जमिनीवर अवलंबून आहे आणि ही जमीन जर अधिग्रहित झाली तर आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल. आमच्या पुढील पिढ्यांचे भवितव्य अंध:कारमय असून, त्यामुळे आम्ही शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवत आहोत. जर सरकारने जबरदस्तीने पाऊल पुढे टाकले तर कोणताही अनुचित प्रकार घडू शकतो. अशा स्थितीत शासनाने भूसंपादन प्रक्रिया थांबवून शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी ओंकार पवार, दत्तराव कोरडे, डिगंबर मोकाशे, दत्तराव मोकाशे, श्रीकांत इखे, रावसाहेब मोकाशे आदी उपस्थित होते.पूर्णा तालुक्यातील सुरवाडी येथेही शेतकऱ्यांनी मोजणी बंद पाडली. संयुक्त मोजणी करण्याकरिता भूमी अभिलेखचे अधिकारी आले यावेळी त्यांच्यासमवेत पोलीस अधिकारी होते. सुरवाडी, नावकी, पिंपळगाव, आहेरवाडी येथील बाधित शेतकऱ्यांनी या मोजणीला विरोध दर्शवला.

यावेळी नावकी येथील सरपंच हनुमान तुकाराम भुसारे, माधवराव पडोळे, आहेरवाडी येथील लिंबाजी खंदारे, गोपाळराव मोरे, गोविंद घाटोळ, महेशकुमार घाटोळ, अनंता घाटोळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. पोखर्णी येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनात ॲड. माधुरी क्षीरसागर, शिवाजी कदम, प्रसाद गोरे, ओंकार पवार, गणेश पाटील आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.कानेगाव (ता. सोनपेठ) येथील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गासाठी संपादित होणाऱ्या जमीन मोजणीला तीव्र विरोध दर्शवला. आपण कोणत्याही परिस्थितीत ही मोजणी करू नये. या मोजणीला आमचा विरोध आहे, अशी भूमिका यावेळी रामचंद्र पंडितराव मोकाशे, धनंजय चंद्रकांत मोकाशे, हेमंत चंद्रकांत मोकाशे, शंकर राठोड, महादेव डुकरे, किसनराव इखे यांनी घेतली.यावेळी शेतकऱ्यांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. या भागातील शेतकऱ्यांचे सर्व भवितव्य हे शेत जमिनीवर अवलंबून आहे आणि ही जमीन जर अधिग्रहित झाली तर आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल.-

### कोणताही अनुचित प्रकार घडू शकतो

आमच्या पुढील पिढ्यांचे भवितव्य अंध:कारमय असून, त्यामुळे आम्ही शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवत आहोत. जर सरकारने जबरदस्तीने पाऊल पुढे टाकले तर कोणताही अनुचित प्रकार घडू शकतो. अशा स्थितीत शासनाने भूसंपादन प्रक्रिया थांबवून शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी ओंकार पवार, दत्तराव कोरडे, डिगंबर मोकाशे, दत्तराव मोकाशे, श्रीकांत इखे, रावसाहेब मोकाशे आदी उपस्थित होते.पूर्णा तालुक्यातील सुरवाडी येथेही शेतकऱ्यांनी मोजणी बंद पाडली. हेरवाडी येथील लिंबाजी खंदारे, गोपाळराव मोरे, गोविंद घाटोळ, महेशकुमार घाटोळ, अनंता घाटोळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. पोखर्णी येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनात ॲड. माधुरी क्षीरसागर, शिवाजी कदम, प्रसाद गोरे, ओंकार पवार, गणेश पाटील आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# वारी काळात ‘व्हीआयपी’ दर्शन पास दिल्यास कारवाई

## सोलापूरचे जिल्हाधिकारीआशीर्वाद यांनी कारवाईचा इशारा दिला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रखुमाईचे ‘व्हीआयपी’ दर्शन पास दिल्यास आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कारवाईचा इशारा सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी , उपविभागीय पोलीस अधिकारी यांना याबाबत त्यांनी पत्राद्वारे आदेश दिला आहे. या निर्णयाचे भाविकांनी स्वागत केले आहे.**



आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, अधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने ‘व्हीआयपी’ पास घेऊन दर्शन घेतात. परिणामी दर्शनरांगेतील भाविकांना मात्र तासन् तास थांबावे लागते. आषाढी यात्रा काळात रोज हजारो भाविक पंढरीत दाखल होत असतात. एकादशीच्या आसपास तर ही संख्या लाखोंच्या घरात जाते. गर्दीमुळे भाविकांना दर्शनासाठी अनेक तास रांगेत उभे राहावे लागते. त्यातच ‘व्हीआयपी’, ओळखीने दर्शन घेणाऱ्या भाविकांमुळे दर्शनासाठी तिष्ठत राहण्याचा काळ वाढतो. हे होऊ नये यासाठी या यात्रा काळात ‘व्हीआयपी’ दर्शन सेवा बंद केली जाते. तरीही अनेकदा मंत्री, आमदार, खासदार, अधिकारी, राजकीय कार्यकर्ते हे थेट प्रवेश देण्याची मागणी, विनंती करतात. प्रसंगी दबाव टाकतात. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी वरील आदेश काढला आहे.आदेशात म्हटले आहे, की आषाढी यात्रेच्या काळात लाखो भाविक येत असतात. यामध्ये सामान्य भाविकांना दर्शनासाठी खूप वेळ रांगेत थांबावे लागते. असे असतानाही ‘व्हीआयपी’ दर्शन पास घेत अनेक जण मध्येच घुसतात. राज्य शासनाच्या विधी व न्याय खात्याने २०१० मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, सण-उत्सव व यात्रा काळातील प्रमुख दिवसांत विशेष दर्शन व्यवस्थेस मनाई आहे.

### या निर्णयाचे भाविकांनी स्वागत केले

या शासन निर्णयाप्रमाणे व्हीआयपी दर्शन बंद ठेवावे व दर्शन रांगेचे सुयोग्य नियोजन करून भाविकांची सोय करावी, अशी सूचना आशीर्वाद यांनी केली आहे. याचे उल्लंघन केल्यास राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रखुमाईचे ‘व्हीआयपी’ दर्शन पास दिल्यास आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कारवाईचा इशारा सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी , उपविभागीय पोलीस अधिकारी यांना याबाबत त्यांनी पत्राद्वारे आदेश दिला आहे. या निर्णयाचे भाविकांनी स्वागत केले आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, अधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने ‘व्हीआयपी’ पास घेऊन दर्शन घेतात. भाविकांना मात्र तासन् तास थांबावे लागते.

# सिनेटने 'बिग ब्युटीफुल बिल' मंजूर केले!

## डोनाल्ड ट्रम्प यांचं महत्त्वकांक्षी असलेलं हे विधेयक काय आहे?

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारल्यापासून आजपर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाची जगभरात चर्चा असते. टॅरिफ धोरण आणि अमेरिकेत बेकादेशीरपणे राहणाऱ्यांना हद्दपार करण्यासह अनेक मोठे निर्णय ट्रम्प प्रशासनाने आतापर्यंत घेतले आहेत. यातच गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प यांच्या महत्त्वकांक्षी असलेल्या 'वन बिग ब्युटीफुल बिला'ची मोठी चर्चा सुरू होती.**



या विधेयकावरून डोनाल्ड ट्रम्प आणि उद्योगपती एलॉन मस्क यांच्यामध्ये मदभेद देखील झाले होते आणि त्यानंतर त्यांच्यात वादही रंगल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, आता हेच 'वन बिग ब्युटीफुल बिल' अमेरिकन सिनेटमध्ये मंजूर झालं आहे. या बिलाचं 'वन बिग ब्युटीफुल बिल ॲक्ट' असं नाव असून हे विधेयक सिनेटमध्ये ५१-५० च्या फरकाने मंजूर करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.खरं तर आज दिवसभर या 'वन बिग ब्युटीफुल बिल ॲक्ट'वर अमेरिकन सिनेटमध्ये चर्चा सुरू होती. तसेच यावर मतदान देखील घेण्यात आलं. यानंतर हे विधेयक अखेर ५१-५० च्या फरकाने मंजूर करण्यात आलं. आता हे विधेयक प्रतिनिधी सभागृहात जाणार असून तिथे देखील येत्या काही दिवसांत त्यावर मतदान होण्याची शक्यता आहे.राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील जनतेला दिलेल्या काही प्रमुख आश्वासनांच्या आधारे दुसऱ्यांदा निवडणूक जिंकली. यातील काही आश्वासने, जसं की विविध देशांमधून आयातीवर शुल्क लादणे, कार्यकारी आदेशांद्वारे अंमलात आणता येतात. परंतु काही आश्वासने अशी आहेत, ज्यांची पूर्तता करण्यासाठी कायद्यात बदल करणे आवश्यक आहे, जो अमेरिकन काँग्रेसचा (प्रतिनिधी सभागृह आणि सिनेट यांचा समावेश) विशेष अधिकार आहे.अशा परिस्थितीत ट्रम्प यांना त्यांच्या सर्व निवडणूक आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी काही गोष्टींसाठी काँग्रेसची मान्यता घ्यावी लागेल. हे लक्षात घेता, ट्रम्प यांनी त्यांच्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर बदलांचा समावेश करून 'बिग ब्युटीफुल बिल' तयार केलं आहे. या विधेयकात ट्रम्प यांनी त्यांचा धोरणात्मक अजेंडा आणि प्रचारातील आश्वासने एकत्रितपणे समाविष्ट केली आहेत.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उद्योगपती एलॉन मस्क यांच्यामध्ये पुन्हा एकदा शाब्दिक युद्ध रंगल्याचं पाहायला मिळत आहे.

खरं तर मागील काही दिवसांपासून एलॉन मस्क आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात मतभेद झाले आहेत. तेव्हापासून दोघेही एकमेकांवर टीका करताना दिसून येत आहे. मस्क हे ट्रम्प यांच्या धोरणावर टीका करत आहेत. यातच मस्क यांनी नवा पक्ष काढण्याचा इशारा दिला. मात्र, त्यानंतर ट्रम्प यांनी मस्क यांना थेट हद्दपार करण्याची धमकी दिल्यामुळे दोघात चांगलंच जुंपल्याचं दिसत आहे. ट्रम्प यांच्या महत्त्वकांक्षी वन बिग, ब्युटीफुल बिलावर सीनेटमध्ये मतदान चालू आहे. यातच या विधेयकावर मस्क यांनी टीका केली. त्यामुळे ट्रम्प चांगलेच संतापले. 'एलॉन मस्क यांना दुकान बंद करून दक्षिण आफ्रिकेला परतावं लागेल', असं विधान करत ट्रम्प यांनी मस्क यांना थेट इशारावजा धमकी दिली. दरम्यान, त्यांच्या या विधानानंतर पत्रकारांनी ट्रम्प यांना प्रश्न विचारला की, एलॉन मस्क यांना खरंच हद्दपार करणार का? यावर ट्रम्प यांनी फक्त एका वाक्यात उत्तर दिलं."मला माहित नाही. मात्र, आपल्याला यावर एक नजर टाकावी लागेल.", असं ट्रम्प यांनी म्हटलं.

### आपण खूप पैसे वाचवू शकतो

दरम्यान, जर वन बिग, ब्युटीफुल बिल हे विधेयक मंजूर झालं तर मस्क यांना इलेक्ट्रिक वाहनांवरील अनुदानाशिवाय बरंच काही गमावावं लागू शकतं, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.मस्क यांना माहिती होतं की मी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांच्या विरोधात आहे. प्रत्येक व्यक्तीवर इलेक्ट्रिक कार खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही. मस्क यांना कदाचित मानवी इतिहासातील कोणत्याही व्यक्तीपेक्षा अधिक अनुदान मिळू शकतं. मात्र, अनुदानाशिवाय त्यांना त्यांचं दुकान बंद करून दक्षिण आफ्रिकेला परत जावं लागेल. अनुदानाशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणावर रॉकेट लॉन्चर उपग्रह व इलेक्ट्रिक कार्सचं उत्पादन होणार नाही. तसेच आपण खूप पैसे वाचवू शकतो", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं.

# अमेरिका भारतावर लादणार ५०० टक्के टॅरिफ

## डोनाल्ड ट्रम्प यांचं नवं धोरणं काय? सिनेटरने दिली मोठी माहिती

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून आजपर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये टॅरिफ धोरण (आयात शुल्क), अमेरिकेत बेकादेशीरपणे राहणाऱ्यांना हद्दपार करण्यासह आदी निर्णयांचा समावेश आहे. खरं तर डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनेक निर्णयांचा फटका जगभरातील देशांना बसत असल्याचंही पाहायला मिळत आहे.**



एका नव्या धोरणाबाबत महत्वाची माहिती समोर आली आहे. भारत आणि चीनसह रशियाबरोबर व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांवर ५०० टक्के कर लादणारे सिनेट विधेयक मांडण्यास डोनाल्ड ट्रम्प यांनी मान्यता दिल्याची माहिती सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी एका मुलाखतीत दिली आहे. त्यामुळे जर असं झालं तर भारतासह चीनला याचा मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.अमेरिकेचे सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी भारत आणि चीनला एकप्रकारे हा इशारा दिला आहे. जर त्यांनी रशियन तेल आयात करणं सुरू ठेवलं तर लवकरच त्यांना परिणामांना सामोरं जावं लागू शकतं, असं ग्राहम यांनी म्हटलं आहे. ग्राहम यांनी म्हटलं की, "हे एक मोठं यश आहे, हे विधेयक काय करतं? हे सांगायचं झाल्यास जर तुम्ही रशियाकडून उत्पादने खरेदी करत असाल आणि युक्रेनला मदत करत नसाल तर तुमच्या उत्पादनांवर अमेरिकेत आल्यावर ५०० टक्के कर आकारला जाईल. आता भारत आणि चीन हे रशियाकडून ७० टक्के तेल खरेदी करतात", असं ग्राहम यांनी एबीसी न्यूजशी बोलताना म्हटलं. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. सिनेटर लिंडसे ग्राहम म्हणाले की, "या विधेयकाला आता ८४ सह-प्रायोजक आहेत तेल आणि इतर वस्तू खरेदी करणे थांबवण्यासाठी या माध्यमातून दबाव आणण्याचा उद्देश आहे.

### भारतासह चीनला याचा मोठा फटका

ज्यामुळे त्या देशांची अर्थव्यवस्था कमकुवत होईल आणि रशियाला युक्रेनमध्ये शांततेसाठी वाटाघाटी करण्यास भाग पाडलं जाईल", असं सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी सांगितलं आहे.या विधेयकामुळे राष्ट्राध्यक्षांना चीन, भारत आणि इतर देशांवर शुल्क लावता येईल. जेणेकरून व्लादिमीर पुतिन यांच्या युद्ध यंत्रणेला पाठिंबा देण्यापासून ते रोखू शकतील आणि त्याचा परिणाम रशिया चर्चेसाठी तयार होईल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी मला कालच सांगितलं की, तुमचं विधेयक मांडण्याची वेळ आली आहे", असं ग्राहम यांनी सांगितलं आहे. दरम्यान, हे विधेयक ऑगस्टमध्ये मांडलं जाण्याची शक्यता आहे. तसेच रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष सुरु असताना हे विधेयक आणत रशियाभोवती आर्थिक फास घट्ट करण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांचा एक भाग असल्याचं बोललं जात आहे.

# सिनेमागृहात जन्म, आईने ‘कश्मिरा’ नाव ठेवलं?

‘स्टार प्रवाह’ वाहिनीवरील ‘लग्नानंतर होईलच प्रेम’ ही मालिका घराघरांत लोकप्रिय आहे. या मालिकेत मृणाल दुसानीस, ज्ञानदा, विवेक सांगळे, विजय आंदळकर, ऋजुता कुलकर्णी अशी जबरदस्त स्टारकास्ट पाहायला मिळत आहे. या मालिकेत रम्या ही खलनायिकेची भूमिका अभिनेत्री कश्मिरा कुलकर्णी साकारत आहे. कश्मिराने नुकतीच ‘राजश्री मराठी’च्या ‘तिची गोष्ट’ या शोमध्ये उपस्थिती लावली होती. यावेळी अभिनेत्रीने तिच्या जन्माचा व नावामागचा खास किस्सा चाहत्यांना सांगितला. कश्मिराचा जन्म सिनेमागृहात झालाय, याबद्दल सांगताना अभिनेत्री म्हणाली “माझी आई गरोदर होती आणि माझ्या आई-बाबांच्या लग्नाचा वाढदिवस सुद्धा त्याचदरम्यान होता. त्यामुळे लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्या दोघांनी सिनेमाला जायचं ठरवलं होतं. पण, त्याचवेळी माझ्या आईला काश्मीरला जायचं होतं. अर्थात, आई गरोदर असल्याने डॉक्टरांनी प्रवास करण्याचा सल्ला दिला नव्हता. म्हणून मग ते दोघं सिनेमाला गेले होते.”त्यावेळी ‘नाचे मयूरी’ हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. त्यादरम्यान आईला प्रसुतीकळा सुरू झाल्या आणि माझा सिनेमागृहात जन्म झाला. आई-बाबांना तेव्हा काश्मीरला जाता आलं नाही म्हणून आणि सिनेमा पाहताना माझा जन्म झाला… हा सगळा विचार करून आईने माझं नाव कश्मिरा ठेवलं. सिनेमागृहात जन्म झाल्याने ही हिरोईन होणार असं आईने आधीच ठरवलं होतं आणि पुढे ही हिरोईन झाली तर कश्मिरा हे नाव शोभेल हा सुद्धा विचार करून तिने माझं नाव ठेवलं होतं.” असं अभिनेत्रीने सांगितलं. कश्मिराला समाजकार्याची आवड आहे. नुकतीच पंढरपूरच्या वारीत सहभागी होऊन अभिनेत्री वारकऱ्यांची सेवा करताना दिसली. याबद्दल कश्मिरा सांगते, “माझ्या आईची इच्छा होती की, मी अभिनय क्षेत्रात काम केलं पाहिजे. माझी अशी इच्छा कधीच नव्हती. मला बिझनेस आणि समाजकार्यात फार रस आहे.”दरम्यान, कश्मिराने आजवर अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. वर्षभरापूर्वी तिने ‘कलर्स मराठी’च्या ‘काव्यांजली’ मालिकेत प्रमुख भूमिका साकारली होती. सध्या अभिनेत्री ‘लग्नानंतर होईलच प्रेम’ या मालिकेत रम्या हे पात्र साकारत आहे. ‘स्टार प्रवाह’ वाहिनीवरील ‘लग्नानंतर होईलच प्रेम’ ही मालिका घराघरांत लोकप्रिय आहे. या मालिकेत मृणाल दुसानीस, ज्ञानदा, विवेक सांगळे, विजय आंदळकर, ऋजुता कुलकर्णी अशी जबरदस्त स्टारकास्ट पाहायला मिळत आहे.



# स्टँडअप कॉमेडीमुळे वाद

विनोद हा खरंतर खळखळून हसायला भाग पाडतो. पण गेल्या काही दिवसांत विनोदामुळे हसण्यावर बंधनं आली आहेत. आक्षेपार्ह जोक, भाषा किंवा शब्द या साऱ्यामुळे ‘स्टँडअप कॉमेडी’ हा कलाप्रकार चर्चेचा विषय ठरत आहे. खरंतर स्टँड अप कॉमेडी म्हटली की, अनेकांच्या चेहऱ्यावर हमखास हसू येतं. पण गेल्या काही महिन्यांत स्टँडअप कॉमेडीमुळे वाद निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. स्टँडअप कॉमेडी शोमध्ये प्रेक्षकांची मस्करी केली जाणं, त्यांच्यावर जोक करणं किंवा विनोदाआडून कोणावर तरी टीका करणं हे सर्रास होत असतं. त्यामुळे कधीकधी प्रेक्षकांनी जोकवर हसण्याऐवजी वाद होत असल्याचे पाहायला मिळत आहे. या सर्व परिस्थितीवर मराठी अभिनेत्रीनेही तिचं मत व्यक्त केलं आहे. यावेळी तिने दुसऱ्यावर विनोद करणं म्हणजे कॉमेडी नाही असं स्पष्टपणे म्हटलं.मराठी अभिनेत्री अनुजा साठेने आरपारला दिलेल्या मुलाखतीत आजच्या कॉमेडीबद्दल तिचं मत व्यक्त केलं. याबद्दल अनुजा असं म्हणाली, “काही कॉमेडीयन्स आहेत, ज्यांचे विनोद मला आवडतात. काही मराठी मुलंही आहेत, जे खूप चांगली कॉमेडी करतात. अनेक स्टँडअप कॉमेडी शो हे खरंच विनोदी असतात. पण काही वेळेस कोणावर तरी विनोद केले जातात आणि ते करणं म्हणजे कॉमेडी नाही.”यानंतर ती म्हणाली, “दुसऱ्यावर जोक करणं याला कॉमेडी म्हणत नाहीत. प्रसंगनिष्ठ जोक असेल तर मला आवडतं. मी एक उदाहरण सांगते, कपिल शर्माच्या शोमध्ये मी तीनवेळा गेले आहे आणि या तिन्ही वेळेस जी प्रहसने झाली.

# शेफालीबरोबरच्या शेवटच्या भेटीची आठवण

‘कांटा लगा’ या गाण्यातून लोकप्रियता मिळवणारी अभिनेत्री शेफाली जरीवाला हिचे शुक्रवारी, २७ जून रोजी निधन झाले. तिच्या अचानक झालेल्या मृत्यूने सर्वांनाच धक्का बसलाआहे. तिच्या मृत्यूचे कारण नेमके काय? याचा तपास सुरू आहे. शेफालीच्या निधनाला तीन दिवस झाले आहेत, पण तिचा पोस्टमार्टम रिपोर्ट अद्याप आलेला नाही. तिचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने किंवा रक्तदाब कमी झाल्याने झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. शेफालीच्या निधनाने तिचा पती पराग त्यागीला मोठा धक्का बसला. शेफालीच्या आई-वडिलांवरही लेकीच्या अचानक जाण्याने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शेफालीच्या मृत्यूनंतर तिचे चाहते दुःख व्यक्त करत आहेत. तिचा पहिला पती हरमीत सिंगनेही पोस्ट करून दुःख व्यक्त केले होते. आता त्याने शेफालीबरोबर शेवटची भेट केव्हा झाली होती, ते सांगितलं.पराग त्यागी हा शेफालीचा दुसरा पती होय. शेफाली जरीवालाचे पहिले लग्न संगीतकार भावाचीं जोडी ‘मीत ब्रदर्स’ मधील हरमीत सिंगशी झाले होते. दोघांनी २००५ मध्ये लग्न केलं आणि २००९ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. शेफालीने हरमीतवर घरगुती हिंसाचाराचे आरोप केले होते. आता हरमीत सिंगने शेफालीच्या निधनानंतर विकी लालवानीशी बोलताना त्यांच्या नात्याबद्दल सांगितलं. एकत्र असताना नातं चढ-उतारांनी भरलेलं होतं. पण, कालांतराने दोघेही सर्व गोष्टी विसरून पुढे गेले.हरमीत एका शोसाठी बांगलादेशला गेला होता, तेव्हाच तो शेफालीला भेटला होता. या गोष्टीला २-३ वर्ष झाले. हरमीत म्हणाला.



# तृप्ती डिमरीची कथित बॉयफ्रेंडसह गोवा ट्रिप

तृप्ती डिमरी बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. तृप्तीने आजवर विविध भूमिका साकारल्या आहेत. परंतु, ती खऱ्या अर्थाने प्रसिद्धीझोतात आली ते ‘ॲनिमल’ चित्रपटामुळे. या चित्रपटानंतर अभिनेत्री अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. अशातच आता अभिनेत्री तिच्या खासगी आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तृप्ती तिच्या कामातून वेळ काढून अनेकदा वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जात असल्याचं तिच्या सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या फोटोंमधून पाहायला मिळतं. अशातच अभिनेत्रीने सोशल मीडियावर गोवा येथील तिचे काही फोटो व व्हिडिओ शेअर केले आहेत. अभिनेत्री तिच्या कामातून वेळ काढत सुट्टया एन्जॉय करत असल्याचं या फोटोंमधून पाहायला मिळत आहे.गोवा येथे तृप्ती एकटी गेली नसून तिच्याबोरबर तिचा कथित बॉयफ्रेंड सॅम मर्चंटही असल्याचं सोशल मीडियावरील फोटोंवरुन पाहायला मिळत आहे. तृप्तीने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर केला या व्हिडीओवर तिने सॅमला टॅग केलं आहे. तर या दोघांनी एकच ठिकाणचे काही फोटो आणि व्हिडिओ त्यांच्या अकाउंटवरुन शेअर केल्या आहेत. तसंच एकमेकांच्या इन्स्टाग्राम स्टोरीही रिपोस्ट केल्या आहेत.तृप्ती गोव्यामधील विविध ठिकाणी फिरत असून ती तिथल्या विविध पदार्थांचा आस्वाद घेत आहे, हे खास क्षण तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. यावेळी तिने पाणीपुरी, भेळपुरी यांसारख्या पदार्थांवरही ताव मारल्याचं या फोटोंमधून पाहायला मिळत आहे. तृप्तीचा कथित बॉयफ्रेंड सॅम मर्चंटबद्दल बोलायचं झालं तर, तो एक मॉडल आहे. मॉडलिंग क्षेत्रात येण्यापूर्वी हॉटेल व्यावसायात सक्रिय होता. सॅम व तृप्ती गोवा येथे पहिल्यांदाच एकत्र फिरायला गेले नाहीयेत; तर यापूर्वीसुद्धा ते फिनलँड येथे एकत्र गेले होते. तर सॅम अनेकदा तृप्तीच्या कामांसाठी तिचं कौतुक करताना दिसतो. ‘स्पिरीट’ या चित्रपटात तिची वर्णी लागल्यानंतर त्याने सोशल मीडियामार्फत तिला शुभेच्छा दिल्या होत्या. दरम्यान, तृप्ती डिमरीबद्दल बोलायचं झालं तर, ‘स्पिरीट’ आणि ‘धडक २’ या चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# पंतकडे एजबस्टनचा ‘किंग’ बनण्याची संधी!

## मोठ्या रेकॉर्डमध्ये विराट कोहलीला सोडणार मागे

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान सुरू असलेल्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा कसोटी सामना बर्मिंघमच्या मैदानावर रंगणार आहे. मालिकेतील पहिला सामना लीड्सच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवासह इंग्लंडने मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरा सामना २ जुलैपासून सुरू होणार आहे. दरम्यान या सामन्यात ऋषभ पंतकडे एजबस्टनच्या मैदानावरील विराट कोहलीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढण्याची संधी असणार आहे.**



हा सामना एजबस्टनच्या मैदानावर रंगणार आहे. एजबस्टनच्या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड हा विराट कोहलीच्या नावावर आहे. मात्र, या सामन्यात ऋषभ पंत विराटला मागे सोडू शकतो. विराट कोहलीच्या नावे एजबस्टनच्या मैदानावर खेळताना २ कसोटी सामन्यांमध्ये ५७.७५ च्या सरासरीने २३१ धावा करण्याची नोंद आहे. विराट हा एजबस्टनच्या मैदानावर सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज आहे. तर भारताचे लिटिल मास्टर सुनील गावस्कर या यादीत दुसऱ्या स्थानी आहेत.सुनील गावस्कर यांच्या नावे एजबस्टनमध्ये २१६ धावा करण्याची नोंद आहे. ऋषभ पंतच्या नावे या मैदानावर फलंदाजी करताना २०३ धावा करण्याची नोंद आहे. त्यामुळे जर ऋषभ पंतने दुसऱ्या कसोटी सामन्यात २९ धावा केल्या, तर या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याच्या रेकॉर्डमध्ये तो विराट कोहली आणि सुनील गावस्करांना मागे सोडू शकतो. या यादीत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर चौथ्या स्थानी आहे. सचिनने बर्घिंघममध्ये खेळताना १८७ धावा केल्या आहेत. तर या यादीत पाचव्या स्थानी असलेल्या गुंडप्पा विश्वनाथ यांच्या नावे एजबस्टनच्या मैदानावर फलंदाजी करताना १७२ धावा करण्याची नोंद आहे. या मालिकेतील पहिला सामना लीड्सच्या मैदानावर पार पडला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना ऋषभ पंतने दमदार शतकी खेळी केली. या डावात त्याने १७८ चेंडूंचा सामना करत १३४ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने पहिल्या डावात ४७१ धावांचा डोंगर उभारला. तर दुसऱ्या डावात भारतीय संघाला ३६४ धावा करता आल्या. या डावातही ऋषभची बॅट चांगलीच तळपली. त्याने १४० चेंडूंचा सामना करत ११८ धावांची खेळी केली.हा सामना एजबस्टनच्या मैदानावर रंगणार आहे. एजबस्टनच्या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड हा विराट कोहलीच्या नावावर आहे. मात्र, या सामन्यात ऋषभ पंत विराटला मागे सोडू शकतो. विराट कोहलीच्या नावे एजबस्टनच्या मैदानावर खेळताना २ कसोटी सामन्यांमध्ये ५७.७५ च्या सरासरीने २३१ धावा करण्याची नोंद आहे. विराट हा एजबस्टनच्या मैदानावर सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज आहे. तर भारताचे लिटिल मास्टर सुनील गावस्कर या यादीत दुसऱ्या स्थानी आहेत.सुनील गावस्कर यांच्या नावे एजबस्टनमध्ये २१६ धावा करण्याची नोंद आहे. ऋषभ पंतच्या नावे या मैदानावर फलंदाजी करताना २०३ धावा करण्याची नोंद आहे. त्यामुळे जर ऋषभ पंतने दुसऱ्या कसोटी सामन्यात २९ धावा केल्या, तर या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याच्या रेकॉर्डमध्ये तो विराट कोहली आणि सुनील गावस्करांना मागे सोडू शकतो. या यादीत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर चौथ्या स्थानी आहे.

### दोन्ही डावात शतकं

सचिनने बर्घिंघममध्ये खेळताना १८७ धावा केल्या आहेत. तर या यादीत पाचव्या स्थानी असलेल्या गुंडप्पा विश्वनाथ यांच्या नावे एजबस्टनच्या मैदानावर फलंदाजी करताना १७२ धावा करण्याची नोंद आहे.या मालिकेतील पहिला सामना लीड्सच्या मैदानावर पार पडला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना ऋषभ पंतने दमदार शतकी खेळी केली. या डावात त्याने १७८ चेंडूंचा सामना करत १३४ धावांची दमदार खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने पहिल्या डावात ४७१ धावांचा डोंगर उभारला. तर दुसऱ्या डावात भारतीय संघाला ३६४ धावा करता आल्या. या डावातही ऋषभची बॅट चांगलीच तळपली. भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान सुरू असलेल्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा कसोटी सामना बर्मिंघमच्या मैदानावर रंगणार आहे.

# बर्मिंघम कसोटीवर पावसाचं सावट?

## 5 पैकी 3 दिवस जोरदार पाऊस; वाचा हवामानाचा संपूर्ण अंदाज

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील दुसरा सामना बर्मिंघममध्ये रंगणार आहे. या सामन्याला २ जुलैपासून सुरु होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरू होईल. या मालिकेतील पहिला सामना लीड्सच्या मैदानावर पार पडला.**



या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे भारतीय संघ हा सामना जिंकून मालिकेत कमबॅक करण्याच्या प्रयत्नात असणार आहे.लीड्सच्या मैदानावर पार पडलेल्या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७१ धावांचे आव्हान ठेवले होते. इंग्लंडने शेवटच्या दिवशी ३५० धावांचा यशस्वी पाठलाग केला आणि सामना जिंकला. या सामन्यात भारतीय गोलंदाजांना आपली छाप सोडता आली नाही. त्यामुळे भारतीय संघ आता बर्मिंघम कसोटी जिंकण्याच्या प्रयत्नात असणार आहे.इंग्लंडमध्ये पावसामुळे सामन्यात व्यत्यय येणं काही नवीन नाही. बऱ्याचदा पावसामुळे सामन्यात अडथळा निर्माण झाला आहे. लीड्स कसोटीतही पावसाने हजेरी लावली होती.

मात्र, याचा सामन्यावर फार परिणाम झाला नाही. दुसऱ्या कसोटीआधी दोन्ही संघांसाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे. कारण या सामन्यातही पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ॲक्यूवेदरने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, सामन्यातील ५ पैकी ३ दिवस पाऊस हजेरी लावू शकतो. सामन्यातील पहिला दिवस म्हणजे २ जुलैला पाऊस पडण्याची शक्यता ८४ टक्के इतकी असणार आहे. तर सामन्याच्या चौथ्या दिवशी म्हणजे ५ जुलैला आणि शेवटच्या दिवशी म्हणजे ६ जुलैला पाऊस पडण्याची शक्यता ही ६०-६० टक्के इतकी असणार आहे. सामन्यातील दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी पाऊस पडणार नाही, मात्र ढगाळ वातावरण असेल.या सामन्यात जसप्रीत बुमराहला विश्रांती दिली जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. तर भारतीय संघ २ फिरकी गोलंदाजांसह मैदानात उतरू शकतो.

### 3 दिवस पाऊस हजेरी लावू शकतो

माध्यमातील वृत्तानुसार, आकाश दीप, अर्शदीप सिंग, नितीश कुमार रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांना दुसऱ्या कसोटीसाठी भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये स्थान दिले जाऊ शकते. भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे भारतीय संघ हा सामना जिंकून मालिकेत कमबॅक करण्याच्या प्रयत्नात असणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। बुधवार ।
। दि. 2 जुलै 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


## प्रारुप DP बाबत कोण दिशाभूल करतंय?

# पिंपरी कॅम्पावर खरंच बुलडोझर?

## ‘व्होट बँक’ साठी सिंधी बांधवांना कोण फसवतंय ?

। पिंपरी- चिंचवड ।
। महाईन्यूज । अविनाश आदक ।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रारुप विकास आराखड्याचे भांडवल करुन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर पिंपरी कॅम्पमध्ये स्थायिक झालेले व्यापारी बांधव आता बेघर होतील? किंवा त्यांच्या घरांवर... दुकानांवर बुलडोझर फिरणार... दुकानांच्या काय ते टपऱ्या होणार...? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे.**





पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रारुप विकास आराखड्याचे भांडवल करुन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर पिंपरी कॅम्पमध्ये स्थायिक झालेले व्यापारी बांधव आता बेघर होतील? किंवा त्यांच्या घरांवर... दुकानांवर बुलडोझर फिरणार... दुकानांच्या काय ते टपऱ्या होणार...? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे.

या पाश्वभूमीवर ‘महाईन्यूज’ ने FACT CHECK केले. धक्कादायक माहिती समोर आली... म्हणजे विकास आराखड्याच्या नावाखाली एखादा राजकीय अजेंडा कशाप्रकारे राबवला जावू शकतो. याचे उदाहरणच पिंपरी-चिंचवडकरांच्या समोर आम्ही मांडणार आहोत. कॅम्प परिसर हा शहराचे व्यापारी केंद्र... त्यामुळे तितकेच संवेदनशील आहे. मग, राजकीय विस्तव पेरणी करणे सहज सोपे नाही का?... मग, गावठाण घोषीत केले असते, तर काय झाले असते? सिंधी बांधवांना प्रश्न पडलाय की पुन्हा पुनर्वसन करण्याची वेळ येते की काय? पण... हा सर्व ‘फेक नॅरेटिव्ह’ चा प्रकार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

FACT-CHECKED • FACT-CHECKED •

वास्तविक, पूर्वी मंजूर विकास योजनेप्रमाणे म्हणजेच कॅम्पातील रस्त्याचे नियोजन कायम ठेवले आहे... नवीन डीपीमध्ये एकही नवीन रस्ता प्रस्तावित केलेला नाही किंवा रुंदीकरणाचा प्रस्तावही नाही. कलम २०५ महानगरपालिका आयुक्त मंजुर विकास आराखड्यातील रस्त्यांच्या रुंदीबाबत अपवादात्मक निर्णय घेवू शकतात. मात्र, तसे प्रारुप विकास आराखड्यात अद्यापतरी काही झालेले नाही. काळेवाडी पूल ते पवनेश्वर मंदिर रस्ता नवीन 18 मीटर प्रस्तावित केला आहे. वाढती लोकसंख्या आणि शहराची गरज लक्षात घेता, तो आवश्यक आहे. त्यामुळे काही दुकाने किंवा घरे बाधित होतील, अशी शक्यता नाही. कारण, हा रस्ता महानगरपालिकेच्या मंजूर आराखड्यातील आरक्षणामध्ये प्रस्तावित केला आहे. मग, साई चौक ते लालबहाद्दुर शास्त्री गार्डन, लालबहाद्दुर शास्त्री गार्डन ते साधु वासवानी चौक, लालबहाद्दुर शास्त्री गार्डन ते अशोक थिएटर, अशोक थिएटर ते तपोवन मंदिर रस्ता, साई चौक ते भाटनगर चौक, पिंपरी स्टेशन ते किम्मतराव आसवणी अंडरपास, रिव्हर रोड ते मिलिंदनगर हून पुढे डिलक्स टॉकी चौक, रवि सोसायटी ते अशोक थिएटर, एमपी कॉलेज समोरल कुदळे कॉलनी रस्ता ते औदुंबर अपार्टमेंट, वीर अभिमन्यू चौक ते तपोवर मंदिर चौक, माळी आळी रोड ते महावीर क्लिनीक असे रस्ते रुंदीकरण प्रस्तावित केले आहेत, असा शोध कोणी लावला? हा प्रश्न आहे. हेतुपूर्वक काही कथित पत्रपंडित जुना डीपी वाचून दाखवत नाहीत.




महाईन्यूज
www.mahaenews.com

**काळेवाडी पूल ते पवनेश्वर मंदिर ब्रीज रस्ता प्रस्तावित केला आहे. मात्र, हा ब्रिज नदीवर आहे. त्यामुळे सिंधी बांधवांची घरे बाधित होतील, अशी शक्यता नाही.**

www.mahaenews.com

### प्रारुप विकास आराखड्यात कम्पासाठी काय आहे?

पिंपरीतील आंबेडकर चौकातून गणेश हॉटेलकडे जाणारा जो रस्ता आहे. तो विकसित झालेला आहे. त्याच रस्त्याच्या अनुशंगाने मोरवाडी चौकाकडून पिंपरी कॅम्पात जाणारा या रस्त्यालगत मेट्रो स्टेशन आहे. त्या ठिकाणी पार्किंग आणि कमर्शिअल कॉम्प्लेक्स प्रस्तावित केले आहे. जुन्या डीपीमध्ये फक्त पार्किंगचे आरक्षण होते. नव्या डीपीमध्ये मेट्रोशी संबंधित आरक्षण प्रस्तावित केले आहे. यामध्ये एकही घर किंवा दुकान बाधित होत नाही. तसेच, जुन्या डीपीनुसार जी अनधिकृत पत्रा स्ट्रक्चर होती. ती आजही आहे तशीच आहेत. पिंपरी चौक ते कॅम्प हा रस्ता पूर्वीच्या मंजुर विकास योजनेनुसार प्रस्तावित असलेला रस्ता जागेवर विकसित झाला आहे. त्यामुळे रुंदीकरणचा प्रश्नच नाही. चिंचवड ते पिंपरी लिंकरोड लगत शगून चौकातील मंजूर विकास योजनेनुसारचे पोस्ट विभागाचे आरक्षण नवीन विकास योजनेत रद्द केले आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधित होणाऱ्या सर्व सिंधी बांधवांना एकप्रकारे दिलासा मिळाला आहे. पोस्ट विभागाच्या आरक्षणामध्ये किमान ४०० ते ५०० दुकांने येतात ही वस्तुस्थिती सिंधी बांधवांनी लक्षात घेतली पाहिजे. शगून चौक म्हणजे सिंधी बांधवांच्या व्यापाराचा केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो. शगून चौकातून पिंपरी कॅम्पमार्गे आतील बाजुने दक्षिणेकडील कापडबाजारातून जाणारा लिंकरोडला जोडणारा प्रस्तावित रस्त्याचे रुंदीकरण जुन्या डीपीमध्ये आहे. मात्र, प्रारुप विकास योजनेमध्ये सदरचे रुंदीकरण रद्द केले आहे.

(पान 2 वर)

### तात्पर्य :

पिंपरी कॅम्प हा परिसर पिंपरी विधानसभा मतदार संघात येतो. सिंधी बांधवांची ‘व्होट बँक’ या ठिकाणी महत्त्वाची आहे. विधानसभा निवडणुकीत सिंधी बांधव विधानसभा उपाध्यक्ष तथा आमदार आण्णा बनसोडे यांच्या पाठिशी राहिले आहेत. आगामी महानगरपालिका निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती होईल. या अस्वस्थेमुळे आमदार बनसोडे यांचे विरोधक प्रशासनाच्या खांद्यावर बंदूक ठेवून भाजपा-राष्ट्रवादी- शिवसेना महायुतीला ‘टार्गेट’ करण्याचा प्रयत्न करीत आहेत. “सिंधी बांधव कट्टर हिंदू आहेत अन् त्यांच्या घरावरच बुलडोझर फिरवण्यात येईल” असा ‘फेक नॅरेटिव्ह’चा प्रयोग ही बाब स्पष्टपणे अधोरेखित करतो. त्यामुळे सुशिक्षित आणि उत्तम व्यवहार ज्ञान असलेले सिंधी बांधव त्याला बळी पडणार नाहीत, हे निश्चित आहे.

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी

# महिला शहराध्यक्षांचा पुढाकार!

### महिला सशक्तीकरणासाठी एक पाऊल पुढे : प्रा.कविता अल्हाट यांचा उपक्रम



| पिंपरी-चिंचवड| प्रतिनिधी : महाईन्यूज |

**महिला सशक्तीकरणासाठी एक पाऊल पुढे ! या उपक्रमा अंतर्गत राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनी पुढाकार घेतला आहे. परिसरातील महिलांच्या आरोग्यासाठी विविध प्रकारचे शिबिर आणि सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

प्रत्येक महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहणे आवडते. स्वतःच्या कर्तत्वाने चार पैसे कमवावे असे अनेकींचे स्वप्न असते. त्यासाठी योग्य मार्गदर्शन आवश्यक असते. अन्यथा अनेक महिला छोटे-मोठे व्यवसाय सुरु करतात आणि ते बंद ही होतात. योग्य निर्णय आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास व्यवसायात यशस्वी व्हायला वेळ लागत नाही. व्यवसाय सुरु करताना काय केले पाहिजे, कुठला व्यवसाय निवडला पाहिजे, डिजिटल मार्केटींग कसे केले पाहिजे, इथपासून मार्केट कसे शिकायचे इथपर्यंत सर्व गोष्टींचे मार्गदर्शन महिलांना देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरामध्ये रूचकर आणि पौष्टीक खाद्यपदार्थ, मोदक आणि विविध प्रकारचे केक याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

कुटूंबांची जबाबदारी सांभाळताना महिला सर्वप्रथम स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. ज्यामध्ये कर्करोग तपासणी, डोळे तपासणी इतर आरोग्य तपासणी करण्यात आल्या.

> महिला सशक्तिकरणासाठी एक पाऊल पुढे! हा उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे आयोजित असून, माझ्या परिसरातील महिलांसाठी हा उपक्रम आपण घेतला आहे. महिला सक्षमीकरण कार्यशाळा ही स्त्रियांचे हक्क, आत्मविश्वास आणि नेतृत्वक्षमतेला नवी दिशा देणारे हे मार्गदर्शन सत्र अनेक महिलांसाठी प्रेरणादायी असणार आहे. तसेच आरोग्याबाबत जनजागृती आणि काळजी, तपासणी शिबिर घेण्यात आले. या उपक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
>
> **–प्रा. कविता आल्हाट,** शहराध्यक्ष

# प्रारुप DP बाबत कोण दिशाभूल करतंय?

(पान 1 वरुन)

या पाश्वभूमीवर 'महाईन्यूज' ने FACT CHECK केले. धक्कादायक माहिती समोर आली... म्हणजे विकास आराखड्याच्या नावाखाली एखादा राजकीय अजेंडा कशाप्रकारे राबवला जावू शकतो. याचे उदाहरणच पिंपरी-चिंचवडकरांच्या समोर आम्ही मांडणार आहोत. कॅम्प परिसर हा शहराचे व्यापारी केंद्र... त्यामुळे तितकेच संवेदनशील आहे. मग, राजकीय विस्तव पेरणी करणे सहज सोपे नाही का?... मग, गावठाण घोषीत केले असते, तर काय झाले असते? सिंधी बांधवांना प्रश्न पडलाय की पुन्हा पुनर्वसन करण्याची वेळ येते की काय? पण... हा सर्व 'फेक नॅरेटिव्ह' चा प्रकार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

वास्तविक, पूर्वी मंजूर विकास योजनेप्रमाणे म्हणजेच कॅम्पातील रस्त्याचे नियोजन कायम ठेवले आहे... नवीन डीपीमध्ये एकही नवीन रस्ता प्रस्तावित केलेला नाही किंवा रुंदीकरणाचा प्रस्तावही नाही. कलम २०५ महानगरपालिका आयुक्त मंजुर विकास आराखड्यातील रस्त्यांच्या रुंदीबाबत अपवादात्मक निर्णय घेवू शकतात. मात्र, तसे प्रारुप विकास आराखड्यात अद्यापतरी काही झालेले नाही. काळेवाडी पूल ते पवनेश्वर मंदिर रस्ता नवीन 18 मीटर प्रस्तावित केला आहे. वाढती लोकसंख्या आणि शहराची गरज लक्षात घेता, तो आवश्यक आहे. त्यामुळे काही दुकाने किंवा घरे बाधित होतील, अशी शक्यता नाही. कारण, हा रस्ता महानगरपालिकेच्या मंजूर आराखड्यातील आरक्षणामध्ये प्रस्तावित केला आहे. मग, साई चौक ते लालबहादुर शास्त्री गार्डन, लालबहादुर शास्त्री गार्डन ते साधु वासवानी चौक, लालबहादुर शास्त्री गार्डन ते अशोक थिएटर, अशोक थिएटर ते तपोवन मंदिर रस्ता, साई चौक ते भाटनगर चौक, पिंपरी स्टेशन ते किम्मतराव आसवणी अंडरपास, रिव्हर रोड ते मिलिंदनगर हून पुढे डिलक्स टॉकी चौक, रवि सोसायटी ते अशोक थिएटर, एमपी कॉलेज समोरल कुदळे कॉलनी रस्ता ते औदुंबर अपार्टमेंट, वीर अभिमन्यू चौक ते तपोवर मंदिर चौक, माळी आळी रोड ते महावीर क्लिनीक असे रस्ते रुंदीकरण प्रस्तावित केले आहेत, असा शोध कोणी लावला? हा प्रश्न आहे. हेतुपूर्वक कथित पत्रपंडित जुना डीपी वाचून दाखवत नाहीत.

### प्रारुप विकास आराखड्यात कॅम्पासाठी काय आहे?

पिंपरीतील आंबेडकर चौकातून गणेश हॉटेलकडे जाणारा जो रस्ता आहे. तो विकसित झालेला आहे. त्याच रस्त्याच्या अनुशंगाने मोरवाडी चौकाकडून पिंपरी कॅम्पात जाणारा या रस्त्यालगत मेट्रो स्टेशन आहे. त्या ठिकाणी पार्किंग आणि कमर्शिअल कॉम्प्लेक्स प्रस्तावित केले आहे. जुन्या डीपीमध्ये फक्त पार्किंगचे आरक्षण होते. नव्या डीपीमध्ये मेट्रोशी संबंधित आरक्षण प्रस्तावित केले आहे. यामध्ये एकही घर किंवा दुकान बाधित होत नाही. जुन्या डीपीनुसार जी अनधिकृत पत्रा स्ट्रक्चर होती. ती आजही आहे तशीच आहेत. पिंपरी चौक ते कॅम्प हा रस्ता पूर्वीच्या मंजुर विकास योजनेनुसार प्रस्तावित असलेला रस्ता जागेवर विकसित झाला आहे. त्यामुळे रुंदीकरणचा प्रश्नच नाही. चिंचवड ते पिंपरी लिंकरोड लगत शगून चौकातील मंजूर विकास योजनेनुसारचे पोस्ट विभागाचे आरक्षण नवीन विकास योजनेत रद्द केले आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधित होणाऱ्या सर्व सिंधी बांधवांना एकप्रकारे दिलासा मिळाला आहे. पोस्ट विभागाच्या आरक्षणामध्ये किमान ४०० ते ५०० दुकांने येतात ही वस्तुस्थिती सिंधी बांधवांनी लक्षात घेतली पाहिजे. शगून चौक म्हणजे सिंधी बांधवांच्या व्यापाराचा केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो. शगून चौकातून पिंपरी कॅम्पमार्गे आतील बाजुने दक्षिणेकडील कापडबाजारातून जाणारा लिंकरोडला जोडणारा प्रस्तावित रस्त्याचे रुंदीकरण जुन्या डीपीमध्ये आहे.

### ब्ल्यू लाईन/ रेड लाईनमध्ये छेडछाड नाही...

कॅम्पपरिसराच्या पश्चिमेकडील पवना नदी लगत निळी व लाल पुररेषेची आखणी संबंधित जलसंपदा विभागामार्फत (WRDA) पुरवण्यात आलेली आखणीच कायम केली आहे. ब्ल्यू/ रेड लाईनमध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड केलेली नाही. तसेच, पवना नदीलगत्या परिसरात पूर्वी मंजूर विकास योजनेत केवळ हरित पट्टा दर्शवला होता. प्रारुप विकास योजनेत नदी सुधार प्रकल्प अंतर्गत RFR योजना राबवण्याचेही प्रस्तावित केले आहे. त्यामुळे नदी संवर्धन, पर्यावरण रक्षण आणि सुशोभिकरण या बाबींचा प्रारुप विकास योजनेत विचार झाला आहे, याचे स्वागत करायला पाहिजे.

### प्रारुप विकास आराखड्यात सुयोग्य नियोजन...

पिंपरी रेल्वे स्थानकालगत दक्षिणेकडील अस्थित्वातील भाजी मंडईचे प्रारुप विकास योजनेमध्ये सुयोग्य नियोजन केले आहे. तसेच, त्या ठिकाणी पोलीस चौकीलाही जागा वाढीव उपलब्ध केली आहे. जुन्या डीपीमध्ये केवळ 'स्लम इप्रूमेंट स्किम'चे आरक्षण दर्शवले होते. प्रारुप विकास योजनेमध्ये 'नोटिफाईड' आणि 'नॉन नोटीफाईड स्लम' असा उल्लेख स्पष्ट केला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी भविष्यात नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने योग्य प्रकारे घरकूल योजना अंमलात येवू शकेल. शासनाच्या योजनांनुसार, अधिकृतपणे घरकूल, प्रधानमंत्री आवास योजना राबवणे शक्य होणार आहे.


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292